| | | | | |
|---|---|---|---|---|
| | M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703. | | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,मुंबई विभागीय मंडळ,वाशी नवी मुंबई— ४०० ७०३ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

क्र.मुंविमं/लेखा—२/4541
वाशी,नवीमुंबई-४०० ७०३
दिनांक. ०९/१०/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्वमाध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
रायगड जिल्हा

विषय:— दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत..

संदर्भ:— १.क्र.रा.मं./लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी/२६—२७/४०४४, दिनांक २९/०९/२०२६ रोजीचे पत्र.

२.मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, यांचा शासन निर्णय क्रमांक:समिती२०२६/ प्र.क्र./८२/मदत—२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय क्र. १ व २ अन्वये फेब्रु/मार्च २०२७ मधील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरून घेण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, शासन निर्णय दिनांक २५ सप्टेंबर, २०२६ अन्वये महाराष्ट्र राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने २६५ तालुक्यांमधील विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत नमूद केलेले आहे.

तरी उपरोक्त शासन निर्णयानुसार फेब्रु/मार्च २०२७ मध्ये आयोजित इ.१०वी व इ.१२वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या रायगड जिल्हयातील श्रीवर्धन दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून पुढील आदेश येईपर्यत परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत राज्य मंडळ कार्यालयाकडून पुढील सूचना प्राप्त झाल्यानंतर यथाशीघ्र निर्गमित करण्यात येईल.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३.

प्रत माहितीस्तव:

मा.सचिव, राज्य मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव:

१.मा.शिक्षण उपसंचालक, मुंबई.

२.शिक्षणधिकारी (माध्य),रायगड यांना कळविण्यात येते की, दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याबाबत माध्यमिक शाळा व कनिष्ट महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

Telephone :- 27652445 , 27662504 , 27881075 , 27881077, 27899987 Fax:- 27659491 / 27881349
Email - sschsc.mumbaiboard@gmail.com lekha2.mumbaiboard@gmail.com Website